**Office Of The sadar Majlis Ansarullah Bharat**

**دفتر صدر مجلس انصار اللہ بھارت**

Ph: +91-01872-220186, Fax : +91-01872-224186, Mob. +91-94170-20616, E-Mail : ansarullahbharat@gmail.com

सारांश व्याख्यान शुक्रवार सय्यदना हजरत अकदस अमिरूल मोमीनीन मसीह चे पंचम खलीफा यांनी कथन केलेले दिनांक २१ ऑगस्ट २०१५, मुक्काम मस्जिद बैतुल फतूह, लंडन

**आपल्या सम्मेलनांचा एक सर्वात मोठा उद्देश तर हाच आहे जो हजरत मसीह मौऊद अ.स. यांनी सांगितला आहे. आणि दीक्षीत होण्याची गरजसुध्दा ही सांगितली आहे की आपण ईश्वर आणि पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा स.अ.स. यांचे प्रेम मनामध्ये सामावून घेऊ. मनामध्ये प्रेम तर त्यावेळी समाविष्ट होईल ज्यावेळी आपण त्यांच्यावर मनापासून मानवंदना पाठवू.**

तशहुद, तअव्वुज आणि सूरः फातिहा च्या तिलावत नंतर हुजूर–ए–अन्वर अय्यदल्लाहु तआला बिनसरहिल अजीज यांनी सांगितले –

देवाच्या कृपेने आज शुक्रवारच्या प्रार्थनेनंतर सालाबादप्रमाणे वार्षिक स्नेहसम्मेलनाची सुरूवात होणार आहे. म्हणजेच सम्मेलनाच्या कार्यक्रमाविषयी जो भाग सुरू होणार आहे प्रथम परंतु या शुक्रवारचे सुद्धा एक वेगळे महत्व आहे. ही सुध्दा गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. म्हणून त्याचे महत्व ध्यानी ठेऊन आपल्याला याचे सुध्दा कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आणि आज सम्मेलनाच्या संदर्भातील कर्तव्य पार पाडण्यासाठी किंवा हे कर्तव्य पार पाडत असताना जी प्रार्थना कराल त्यामध्ये सम्मेलन यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रार्थना देखिल करत रहा.

शुक्रवार या दिवसाचे महत्व हदिसमध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की – पवित्र पैगंबर मोहम्मद (स.अ.स.) यांनी कथन केले की दिवसांमधून सर्वश्रेष्ठ दिवस शुक्रवार हा आहे. या दिवशी माझ्यावर मोठ्या संख्येने कृपावर्षाव पाठवत रहा कारण याप्रकारे तुमची ही मानवंदना माझ्यासमोर सादर केली जाईल. त्यानंतर पवित्र पैगंबर (स.अ.स) यांनी सांगितले की या दिवशी एक अशी घटिका येते की अशावेळी भक्त ईश्वराची प्रार्थना करताना जी प्रार्थना करेल ती पूर्ण केली जाते आणि ते पुढे सांगतात की खुप छोटा कालावधी असतो. तर हे महत्व आहे शुक्रवारचे आणि जर आपण आजच्या दिवशी आजची प्रार्थना आणि व्याख्यान ऐकण्या दरम्याने, कारण व्याख्यान हे देखिल प्रार्थनेचा एक भाग आहे. त्या सर्व प्रार्थनांमधून सर्वात महत्वाची प्रार्थना ही आहे की कृपावर्षाव (दरूद) पाठवावा. लक्षपूर्वक कृपावर्षाव पाठवावा. दयावान पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा म्हणत असाल तर त्या हुशारीने, तल्लीनतेने आणि विचारपुर्वक म्हणावे की हे परमेश्वरा ! पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा (स.अ.स) यांच्या नामस्मरणास उच्च करून त्यांचा सुंदर संदेश आणि शिकवण यशस्वी करून आणि त्याचा प्रसार करून त्यांनी आणलेल्या प्रेषितत्वाची खऱ्या रंगात प्रस्थापना करून त्याचे महत्व आणि श्रेष्ठत्व जगात सादर करू दे आणि आम्हाला त्याचा प्रसार करण्यास मदत करण्याची कृपा करून त्यांच्या वंशात प्रस्तूत पारितोषिकांमधून सहभागी बनवू दे. आणि जेव्हा आपण त्या दयावान महापुरूषाला मोहम्मद म्हणत असू तर अशा विचारानीशी की हे ईश्वरा ! आमची ही देखिल प्रार्थना आहे की तू पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा स.अ.स. यांची जी काही मानमर्यादा आणि सर्वोत्तम चारित्र्य प्रस्तुत केले आहेस. त्याला कायमस्वरूपी प्रस्थापित करून शत्रुला नामोहरम करून त्याला आम्हाला सुध्दा पाहण्यास आणि त्याचा सहभागी होण्याची कृपा कर. जेव्हा आपण हे यशस्वी चमत्कार पाहू पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा स.अ.स. यांच्याविरूध्द रचण्यात येणारा प्रत्येक कट आणि कारस्थान शत्रुवर उलटू दे. तसेच जेव्हा आपण आज एकत्र येऊन ही प्रार्थना सार्वजनिक स्वरूपात करत असतो त्यावेळी ही अशी प्रार्थना आहे जी ईश्वरासमीप खरोखरच प्रेम आणि स्विकारहार्य ठरते आणि पाहिली जाते. तसेच प्रार्थनेचा स्विकार झाल्यावर आपल्यावर त्याची कृपा होते. त्यानंतर त्याच्या प्रस्तुत आशीर्वादाचे आपण सहभागी देखील बनत जातो. ज्यावेळी त्यांच्यासमोर (मोहम्मद मुस्तफा स.अ.स.) त्यांच्या अनुयायीं ची प्रार्थना सादर केली जाते. त्यांच्यावर मानवंदना पाठविली जाते. त्यावेळी त्यांच्या प्रार्थनेची कृपादृष्टी सुध्दा आपल्याला भेटते. तसेच अशाप्रकारे कृपावर्षावांचा एक चक्र सुरू होतो. आपल्या सम्मेलनांचा एक सर्वात मोठा उद्देश तर हाच आहे जो हजरत मसीह मौऊद अ.स. यांनी सांगितला आहे. आणि दीक्षीत होण्याची गरजसुध्दा ही सांगितली आहे की आपण ईश्वर आणि पवित्र पैगंबर मोहम्मद

मुस्तफा स.अ.स. यांचे प्रेम मनामध्ये सामावून घेऊ. मनामध्ये प्रेम तर त्यावेळी समाविष्ट होईल ज्यावेळी आपण त्यांच्यावर मनापासून मानवंदना पाठवू कारण ईश्वराचा सुध्दा हा आदेश आहे आणि आपल्या परिस्थितीलासुध्दा त्याप्रमाणे बदलावे आणि बदलण्याचा प्रयत्न करावा ज्याचा आदर्श पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा स.अ.स. यांनी आपल्यासमोर सादर केला आहे. त्यांच्या प्रेमामुळे त्यांच्यावर मानवंदना पाठवा आणि त्यांचे अनुकरण तसेच ईश्वराचे प्रेमसुध्दा मिळविणारे बनवेल.

म्हणून शुक्रवारच्या प्रार्थनेदरम्यान सुध्दा आणि शुक्रवार नंतर सुध्दा मोठया प्रमाणात आणि बाकीच्या दोन्ही दिवसांमध्ये सुध्दा लक्षपुर्वक कृपावर्षाव आणि ईश्वराचे नामस्मरण करण्यात प्रत्येक क्षण व्यतित करण्याचा प्रयत्न करा. कारण ईश्वर आपल्यावर दया करेल. आपल्या शत्रूंच्या सर्व कारवायांना आळा घालेल. त्यानंतर मोहम्मद पैगंबर स.अ.स. यांच्या आदर्शामध्ये आपल्याला माणुसकीचे सुध्दा सर्वोत्तम नमुने पहायला मिळतात. यासाठी सुध्दा आपल्याला प्रयत्न केला पाहिजे, की या सर्व गोष्टी स्वतःवरही लागू करू.

ईश्वराने पुण्यवान भक्ताची ही निशाणी सांगितली आहे की ते आपापसांत प्रेम, सद्‌भावना आणि सहानुभूतीची भावना ठेवून जीवन व्यतित करणारे हवेत आणि त्यामध्ये सुध्दा आपल्याला पवित्र पैगंबर मोहम्मद मुस्तफा स.अ.स. यांचा आदर्श जो दृष्टीक्षेपात येतो आणि ज्याचा नकाशा ईश्वराने सुध्दा ओढला आहे की – ''तुमचे संकटात पडणे त्याच्यावर त्रासदायक ठरते.'' तथापि जो प्रेम त्यांना त्यांच्या पुण्यभक्तांवर होता. त्यांना सहन नव्हते की, त्यांना होणारा थोडासा सुध्दा त्रासदेखिल त्यांना अस्वस्थ करत असे. हा आदर्श आहे जो आपल्यासमोर ठेवला गेला की, एकमेकांचा त्रास तुम्हाला अस्वस्थ करणारा पाहिजे. आणि हे त्याक्षणी होऊ शकते जेव्हा खऱ्या रंगात आपापसांत दया आणि प्रेमाची भावना उत्पन्न होईल.

संम्मेलन आयोजित करण्याच्या उद्देशामधून एक उद्देश अहमदिया जमाअतचे संस्थापक हजरत मिर्जा मसीह मौऊद अ.स. यांनी हे सांगितले आहे की, जमाअतशी नातेसंबंध प्रस्थापित होतात आणि हे नातेसंबंध त्याचवेळी प्रस्थापित तसेच घनिष्ट होतात ज्यावेळी मनुष्य निस्वार्थ भावनेने एकमेकांसाठी त्याग करेल. एकमेकांच्या भावनांची काळजी घेईल. आरंभीच्या सम्मेलनांमध्ये जेव्हा अजून परिवर्तनाचे ते स्तर प्राप्त झाले नव्हते जे हजरत मसीह मौऊद अ.स. त्यांच्याकडून इच्छितात. आणि त्यागाची ती भावना नव्हती. जरी श्रध्देनूसार कट्टरता निर्माण झाली होती. परंतू वातावरणाच्या प्रभावामुळे मानवता, प्रेम आणि बंधुत्वाचे ते स्तर आचरणात आले नव्हते जे हजरत मसीह मौऊद अ. स. आपल्या जमाअतीमध्ये निर्माण करू इच्छित होते. तर आपण जेव्हा ही तक्रार ऐकली की, संम्मेलनामध्ये एकदुसऱ्यांची काळजी घेतली गेली नाही. आणि आपल्या आरामास प्रत्येक व्यक्तिने दुसऱ्यांच्या आरामावर श्रेष्ठता दिली. ते या गोष्टीवर नाराज झाले आणि या नैराश्यातून त्यांनी एक वर्ष सम्मेलन आयोजित केला नाही. त्यांनी परखडपणे सांगितले की, मी खरं खरं सांगतो की मानवाची श्रध्दा कधीच दुरूस्त असू शकत नाही. जोपर्यंत आपल्या विश्रामावर आपल्या भावांचा विश्राम श्रेष्ठ न ठरवेल.

म्हणून हे पाहिले पाहिजे की हजरत मसीह मौऊद अ. स. यांची मनोकामना ही होती की आपल्या जमाअत च्या व्यक्तिंमध्ये बंधुभाव, प्रेम आणि माया पहावी. ते या गोष्टीवर अस्वस्थ होतात की, आपले अनुयायी एकमेकांच्या त्रासाची जाणीव ठेवत नाहीत. तथापि सम्मेलनास येणाऱ्यांनी जिथे सम्मेलनाचा उद्देश पूर्ण करण्यासाठी ईश्वर आणि त्याचे पवित्र प्रेषित मोहम्मद पैगंबर स.अ.स. यांचे प्रेम उत्पन्न करावे. तसेच आपापसातील प्रेम, माया आणि बंधुभावाची जाणीव दृढ करणे आहे. आपल्या धार्मिक ज्ञानात सुध्दा भर घालावी. त्यांनी एके ठिकाणी या कैफियतचा जो सम्मेलनाच्या उद्देशासंदर्भात आहे आणि जो सम्मेलनामध्ये सामील होणाऱ्यांमध्ये उत्पन्न होतो किंवा झाली पाहिजे याप्रकारे नकाशा खेचला आहे आणि सांगितले आहे. आपण सांगतात की–

सर्व मित्रांना फक्त ईश्वराच्याच गोष्टी ऐकण्यासाठी आणि प्रार्थनामध्ये सामील होण्यासाठी या दिवशी आले पाहिजे आणि या सम्मेलनात असे ऐतिहासीक आणि शैक्षणिक गोष्टी ऐकवण्याचा कार्यक्रम असेल. जी श्रध्दा आणि जो विश्वास आणि शिक्षणामध्ये सफलता प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे. तसेच आणखिन त्या मित्रांसाठी खास प्रार्थना आणि विशिष्ट लक्ष असेल. तसेच याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल की परमेश्वर आपल्याकडे त्यांना ओढून घेईल आणि आपल्यासाठी स्वीकार करेल. तसेच पवित्र परिवर्तन त्यांच्यामध्ये घडवून आणेल. एक प्राकृतिक फायदा या सम्मेलनाचा हा देखिल होईल की प्रत्येक नूतन वर्षी ज्याप्रमाणे नविन भाऊ या जमातीमध्ये सामील होईल तो ठरवलेल्या तारखेला हजर होऊन आपल्या आधिच्या भावंडांचे मुख दर्शन करेल आणि तेजस्वी होऊन आपापसातील नातेसंबंध दृढ होत राहील. समस्त भावंडांना

आत्मिक दृष्टीने एकत्रित करण्यासाठी आणि त्यांच्यातील रोष, अनोळखेपणा आणि दूरावा कमी करण्यासाठी ईश्वराच्या दरबारी प्रयत्न केला जाईल. तसेच या आध्यात्मिक सम्मेलनात आणखिन भरपूर आत्मिक फायदे आणि नफा होईल जो ईश्वराच्या कृपेने वेळोवेळी सादर होत राहील.

तथापि आपल्यामधून प्रत्येकास या गोष्टींची जाणीव असली पाहिजे की, आपण येथे या दिवसांत सम्मेलनाच्या उद्देशास पूर्ण करायला हवे आणि जसेकी हजरत मसीह मौऊद अ. स. यांनी एका दुसऱ्या ठिकाणी स्पष्ट केले आहे की, जगातील मेळ्यासारखा हा मेळा समजू नये. जसे की या लेखावरून स्पष्ट होते की, आपले लक्ष या दिवसांत ईश्वरी गोष्टी ऐकण्यावर केंद्रित असले पाहिजे. आपापसातील ग्रुपमध्ये आणि वायफळ गप्पागोष्टींमध्ये वेळ घालवता कामा नये. तसेच आपल्या वेळेतील बराचसा भाग बाजारांमध्ये घालवून वेळ वाया घालवू नये. आपला वेळ जो सम्मेलनाच्या व्यतिरिक्त इतर शिल्लक राहिलेल्या वेळेत तो वेळ आध्यात्मिक गोष्टी किंवा ईश्वराच्या नामस्मरणात घालवावा. अथवा दुसरे जे कार्यक्रम आहेत ते पहावेत. जसेकी काही ठिकाणी अशा गोष्टी आहेत इकडे तिकडे फिरण्याव्यतिरिक्त किंवा बाजारांमध्ये फिरण्यापेक्षा काही जमाती स्तरावर व्यवस्था केलेली असते. ज्यामुळे मनुष्याच्या श्रध्देत आणि विश्वासात वाढ होते. जसेकी छायाचित्रांचे दालन आहे येथे त्यांनी प्रदर्शन ठेवले आहे. एका जमातीचा इतिहास आहे त्याला पहा. आणि ईश्वराच्या कृपेचे स्मरण करा, की कशातऱ्हेने ईश्वर हजरत मसीह मौऊद अ. स. यांच्या गोष्टी पूर्ण करत आहे. आणि त्यांच्याशी केलेली आश्वासने पूर्ण करत आहे. तसेच जमातीची ओळख आणि प्रचार कशाप्रकारे जगाच्या किनाऱ्यापर्यंत पसरवत आहे? तसेच तेथे अहमदिया जमातीच्या शहीदांची छायाचित्रे आहेत. ती पहा, व त्यांना उच्च दर्जा प्राप्त होण्यासाठी आणि आपल्या श्रध्देच्या मजबुतीसाठी तसेच त्यांच्या कुटुंबि यांसाठी आणि जमाअतच्या व्यक्तींसाठी प्रार्थना करा. ईश्वर प्रत्येक ठिकाणी जमाअतला शत्रुंच्या कारवायांपासुन सुरक्षित ठेवू दे. तसेच छपाईवाल्यांची दालने असतात. त्यांचाही एक हॉल आहे. तेथे जाऊन यावर्षी जी पुस्तके, लिट्रेचर छापण्यात आली आहेत ती पहा. जे खरेदी करू शकतात त्यांनी खरेदी करा. तसेच रिव्हीव ऑफ रिलीजन यांचे जे दुकान आहे त्यांनी आपली जागा वाढवली आहे तसेच येशू ख्रिस्ताच्या कफन संदर्भात तेथे भरपूर प्रमाणात माहिती उपलब्ध आहे ते पहा. आणि हजरत मसीह मौऊद अ. स. यांचे सत्य आणि सत्यता या गोष्टींना पाहून जी आणखिन भरीव माहिती मिळते त्याचा आपल्या श्रध्देत वाढ करा. याप्रकारे सम्मेलनाच्या मुख्य कार्यक्रमव्यतिरिक्त इतर विविध भाषांमधील प्रोग्राम होतात त्यामधून सुध्दा फायदा उठवला पाहिजे आणि जे करू शकतात तसेच केले पाहिजे. सम्मेलनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर आपापसांत ओळख वगैरा करण्यासाठी एकमेकांशी भेटले पाहिजे. सम्मेलनानंतर खूपसे नविन अहमदी या गोष्टींचा उजाळा करतात की आपली भाषा भिन्न असली तरीही आपण विविध देशातीली अहमदिंशी भेटतो त्यावेळी खाणाखुणांच्या भाषेतही जे प्रेम आणि मायेची भावना उत्पन्न होत असते आणि दृढ होते ती अशी असते की शब्दांत व्यक्त करू शकत नाही.

अपितु हजरत मसीह मौऊद अ. स. यांनी जे सांगितले आहे की आपापसांतील नातेसंबंध ओळखी वाढल्या पाहिजेत आणि आत्मिक स्वरूपात सर्व भाऊबंध एकत्र येवोत आणि त्यांच्यातील रोष, अनोळखिपणा आणि दूरावा दूर होण्यासाठी प्रयत्न होवो आणि त्यासाठी प्रार्थना असेल तर एकमेकांतील घनिष्ठ नातेसंबंध आणि एकमेकांसाठी प्रार्थना एक असे वातावरण निर्माण करतात की ज्याचे उदाहरण फक्त आपल्याच सम्मेलनात पहावयास मिळतात.

तर प्रत्येकाला प्रयत्न केला पाहिजे की असे नातेसंबंध आणि ओळख प्राप्त करा आणि वाढवा. अशातऱ्हेने याची सुध्दा प्रत्येकाला प्रयत्न आणि प्रार्थना करणे आवश्यक आहे की, ते समस्त आध्यात्मिक फायदे ज्यांचा हजरत मसीह मौऊद अ. स. यांनी स्पष्ट केले आहे की आणि भरपुर प्रमाणात आध्यात्मिक फायदे झाले पाहिजेत त्या सर्वांपासून आपण सहभाग घेणारे बनू. ही सुध्दा प्रार्थना केली पाहिजे आणि त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आपल्यामधील प्रत्येकाला यासंदर्भात लक्ष घालण्याची आवश्यकता आहे की प्रामाणिकपणा कसा होता. त्या सर्व प्रोग्रामांना ऐका नाहीतर तुम्हा लोकांचा एवढा खर्च करून इथे येणे आणि तसेच जमाअतचा मोठ्या स्वरूपातील व्यवस्थेसाठी सुध्दा एवढा जास्त खर्च करणे, सर्व नुकसानीचे आहे.

तर येणारे समस्त पाहुणे, सम्मेलनात सामील होणारे सम्मेलनात सामील होण्याच्या उद्देशाला समोर ठेवा आणि मोठ्या प्रमाणात त्याचा फायदा प्राप्त करण्याचा प्रयत्न करा. ईश्वर आपणा सर्वांना त्याची कृपा दृष्टी देवो. तसेच व्यवस्थापकाच्या दृष्टीने सुध्दा लक्ष पूरवू इच्छितो की व्यवस्थापकांशी पूर्णपणे सहाय्य करा. व्यवस्थापक जिथे आपल्या

सेवेसाठी आहेत ते तुमच्या फायद्यासाठीच आहे. आणि जर त्यांच्याशी सहाय्य असेल तर ठिक सोयीसुविधा उपलब्ध होतील. ते सम्मेलनाच्या हॉल मध्ये बसण्यासाठी आदेश असेल पुरूषांसाठी आणि स्त्रियांसाठी तसेच मुलबाळ असलेल्या आयांसाठी, किंवा जेवणाची व्यवस्था असणाऱ्या हॉल मध्ये जेवणाच्यावेळी जाणे आणि एका नियमाप्रमाणे खाण्याची व्यवस्था असेल तर त्याची पूर्णपणे अंमलबजावणी करावी परंतु जेवण वाढणारे जे व्यवस्थापक आहेत त्यांनीसुध्दा हे लक्षात ठेवले पाहिजे की काही लोकांना त्यांच्या आजारामुळे किंवा काही आणखिन कारणामुळे मजबूरीमुळे काही वेळा उशीरा आल्यामुळे आणि काही मुलंबाळं असलेल्या स्त्रियांना काही कारणास्तव जेवण जेवण्याच्या वेळेव्यतिरिक्त सुध्दा जेवणाची आवश्यकता पडू शकते किंवा हॉलमध्ये जावे लागते यासाठी तेथे काहीतरी व्यवस्था प्रत्येक वेळीसुध्दा असणे गरजेची आहे. परंतु कारण बाजार तर त्यावेळी बंद असतात, काही वेळेस तुम्हाला हे लक्षात ठेवले पाहिजे की पाहुण्यांना की ते सम्मेलनाच्या वेळी या गोष्टीकडे लक्ष ठेवतील की त्यांनी सम्मेलनाचा फायदा उठवला पाहिजे हे समजता नये की थोडीशी सुट आहे तर व्यवस्थापकांना उगाचच त्रास देत राहतील. तुम्ही प्रयत्न करा की मुलबाळं असलेल्या स्त्रिया आपल्या मुलांसाठी खाण्यासाठी काही ना काही स्वतःबरोबर घेऊन यावे आणि वेगळे बसून त्यांना भरवावे. त्यांचे हॉलसुध्दा वेगवेगळे आहेत.

अशाप्रकारे टेरेफिक च्या व्यवस्थापकांना सुध्दा भरपूर सहाय्य करा. तसेच सेक्युरीटी च्या व्यवस्थापकांशीसुध्दा भरपूर प्रमाणात सहाय्य करा आणि स्वतःदेखील हुशारीने प्रत्येक अहमदीला आमचा हा सुध्दा मोठा सेक्युरीटीची व्यवस्था आहे . डावीकडे उजवीकडे आपली नजर ठेवली पाहिजे. जगाची अवस्थासुध्दा अशी आहे, आणि जमाअतच्या सफलतेमुळे जळणाऱ्यांच्या छेडछाडीमध्ये सुध्दा वाढ झाली आहे. म्हणून याकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि सर्वात जास्त तर जळणाऱ्यांची जलन आणि छळणाऱ्याच्या छळापासून सुरक्षित राहण्यासाठी भरपूर प्रमाणात प्रार्थना करा. या दिवसांत जसे की अगोदरसुध्दा मी सांगितले आहे की, परमेश्वर सर्व प्रकारे सम्मेलनास सफल करू दे, सम्मेलनातील प्रोग्राम सुध्दा प्रत्येकास दिले जातात त्यावर काही आदेश लिहिलेले आहेत ते लक्षपुर्वक वाचावेत आणि आचरणात आणावे.

शुक्रवारच्या व्याख्यानाच्या शेवटी हुजुर अन्वरनी महोदय अक्रमुल्ला साहेब, मुलगा महोदय करीमुल्लासाहेब रा. नोन्साशरीफ, डेरा गाजीखान ज्यांना विरोध्यांनी दिनांक १९ ऑगस्ट २०१५ रोजी शहीद केले. त्यांचा स्मरण करताना सांगितले की त्यांचे प्रशंसनीय कार्य आणि सेवा यांचे स्मरण केले आणि त्यांच्या कुटुंबियांना सबुरी मिळण्यासाठी प्रार्थना केली.

दुसरा जनाजा महोदय प्रोफेसर चौधरी मोहम्मद अली साहेब एम. ए. यांचा आहे जे आजकाल तेहरीक–ए–जदीद या प्रकाशनाचे वकील होते. दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी त्यांचे देहावसन झाले. त्यांचा जन्म १९१७ चा आहे. हजुर अन्वर यांनी त्यांच्या भरपूर मोठया सेवेतील जीवनाचा आढावा घेतला आणि त्यांच्या मोक्षासाठी, उच्च दर्जा मिळण्यासाठी प्रार्थना केली आणि सांगितले त्यांच्यासारखा प्रामाणिक, प्रेमळ आणि खिलाफतचे प्रेमी परमेश्वर नेहमी जमाअतला देत राहो. आमीन.

Khulasa Khutba Jumma Huzoor Anwar 21th August 2015

*BOOK-POST (PRINTED MATTER)*

*TO,*..........................................................................

..........................................................................

From; *Office Ansarullah Bharat, Aiwan-e-Ansar, Moh; Ahmadiyya,Qadian-143516Via; Batala, Dist; Gurdaspur (Pb)*